NAVJYOT / Vol. XIV / Issue – I ISSN 2277-8063

# स्वातंत्र्योत्तर कालखंडातील स्त्री विकासाचा नवा अवकाश

प्रा.डॉ.जयकुमार चंदनशिवे कन्या महाविद्यालय,मिरज.

---

**प्रस्तावना :**

महिला सक्षम करण म्हणजे महिलांना सर्व क्षेत्रांमध्ये सक्षम या बनविणे त्यांना स्वतःच्या हक्काची जाणीव करून देणे आणि स्वावलंबी बनविणे समाजातील स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने अधिकार संधी आणि सन्मान मिळावा यासाठी महिला सक्षमीकरण अत्यंत महत्त्वाचे आहे. प्रस्तुत निबंधात स्वातंत्र्य उत्तर काळातील स्त्रियांच्या विकासाच्या टप्प्यांचा आढावा घेण्यात आला आहे.

महाराष्ट्रात खऱ्या अर्थाने सुरुवात झाली ती इंग्रजांच्या आगमनाच्या काळात या कालखंडात समाज प्रबोधन मोठ्या प्रमाणात झाले. धर्म,वर्ण,जाती,रूढी, परंपरा यामध्ये अडकलेल्या समाजाला नवी दिशा मिळाली. शिक्षणासारखे महत्त्वपूर्ण कार्य याच कालखंडात केले गेले. महाराष्ट्रातील तत्कालीन सामाजिक परिस्थिती बदलण्यासाठी ज्या व्यापक पद्धतीची चळवळ उभी राहणे आवश्यक वाटते. तो पाया या काळात भक्कमपणे तयार झाला. लोकहितवादी, महात्मा फुले, न्यायमूर्ती रानडे, दादोबा पांडुरंग, बाबा पद्मनजी ,सावित्रीबाई फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महर्षी कर्वे ,विठ्ठल रामजी शिंदे, ताराबाई शिंदे या समाजसुधारकांनी निकराचे प्रयत्न केले. अत्यंत क्रांतिकारी सामाजिक आशय घेऊन भारतात बंगालच्या पाठोपाठ महाराष्ट्रात ही प्रयत्न झाले .

स्त्रीच्या शोषणाचे आणि गुलामगिरीचे अज्ञान हेच मुख्य कारण आहे .हे सुधारकांच्या लक्षात आल्याने त्यांनी स्त्रियांना शिक्षण दिले पाहिजे तरच त्यांचं शोषण नष्ट होईल. म्हणून महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांनी पुण्यात मुलींच्या साठी शाळा काढली. महाराष्ट्रात स्त्री शिक्षणास प्रारंभ केला अस्पृशता व जातीपातीचे निर्मूलन करून निराधार, विधवा, कुमारी माता अशा पिढीत शोषित स्त्रियांना आसरा दिला एका कुमारी मातेच्या मुलास महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी दत्तक घेऊन समाजापुढे एक आदर्श निर्माण केला.

ताराबाई शिंदे यांनी स्त्री पुरुष तुलना या पुस्तकात स्त्रिया सर्वदृष्टीने पुरुषांच्या बरोबरीच्या आहेत. त्यांनी अनेक उदाहरणे दिली आहेत. स्त्रीला कमी लेखण्याचा समाजाला कोणताही अधिकार नाही असा सवाल त्यांनी केला. ज्या कालखंडात सुधारणा वादावर कोणीही बोलत नव्हते. त्या काळात ताराबाईने सडेतोड लेखन करून समाज जागृतीचे कार्य केले. महाराष्ट्रात या काळात राजकीय व सामाजिक बदलाची सुरुवात झाली. हा काळ टिळकांचा कालखंड म्हणून ओळखला जातो. आधी सामाजिक सुधारणा अशा प्रकारचे प्रश्न निर्माण झालेले होते. पण टिळक यांना सामाजिक सुधारणा ऐवजी राजकीय सुधारणा आवश्यक वाटत होत्या याच काळात राजकीय प्रश्नांना अग्रक्रम मिळाला होता. महर्षी कर्वे यांनी या कालखंडात स्त्री शिक्षणाचे कार्य हाती घेतले त्यांनी भारतात स्वतंत्र महिला विद्यापीठाची स्थापना केली. सर विठ्ठलदास ठाकरशी ह्या दानशूर व्यक्तीने भरीव अशी मदत या विद्यापीठाला दिली. पहिल्या महायुद्धानंतर महात्मा गांधींचा राजकारणातील प्रवेश ही घटना भारतीय स्त्रियांच्या परिवर्तनास चालना देणारी म्हणून महत्त्वाचे आहे.

भारताला १९४७ साली स्वातंत्र्य मिळाले. १९५० मध्ये भारताने लोकशाही गणराज्य पद्धतीचा स्वीकार केला. नंतर स्वातंत्र्याचा आनंद देशभर साजरा होऊ लागला. पारतंत्र्य संपल्यानंतर भारतात नवीन पर्वाला प्रारंभ झाला.

राजकीय व्यवस्थापन परंपरागत भारतीय समाजव्यवस्था तेथील विविध धर्म ,पंथ, जाती यांच्यातील विषमता नाहीशी करून भारतीय प्रशासनाला नव्या विचारांची समाजाची पुनर्बांधणी करायची होती. नागरिक म्हणून असणारे हक्क कर्तव्य अधिकार आणि विकासाभिमुख समतोल प्रस्थापित करायचा होता. स्त्रियांच्या बाबतीत वैचारिक जाणीव जागृती ची सुरुवात १९ व्या शतकात सुरू झाली होती. स्त्रियावर होणारे अन्याय , अत्याचार,सामाजिक रूढी, परंपरा त्यांना छेद देऊन त्यांना कायदेशीर अधिकार देण्याची सुरुवात झाली होती. स्त्रियांचा अन्य घटकाप्रमाणे विचार होऊन घटनात्मक अधिकार दिले गेले त्यामुळे समाजात स्त्रियांना कायद्याच्या माध्यमातून समानता दिली गेली. समाजात स्त्री-पुरुषांमधील तरी घटनेने कमी केली. स्त्रियांना मतदानाचा अधिकार दिला घटनाकारांनी २१ वर्षे पूर्ण केलेल्या व आता १८वर्षे पूर्ण झालेल्या स्त्री-पुरुषांना मतदानाचा हक्क दिला गेला. संसदेत व राज्य विधिमंडळाच्या कोणत्याही सभागृहाच्या निवडणुकीसाठी प्रत्येक मतदारसंघाची एकत्र सर्वसाधारण यादी असेल आणि कोणत्याही व्यक्ती केवळ धर्माच्या वंशाच्या जातीच्या व लिंगाच्या किंवा यापैकी कोणत्याही एखाद्या कारणाकरिता त्या यादीत समाविष्ट होण्यास पात्र समजली जाणार नाही किंवा खास मतदार यादीत आपला समावेश करावा.असा हक्क सांगू शकणार नाही.

भारतीय राज्यघटनेत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी समाजातील स्त्रीचे दीर्घ काळापासून चालत आलेले दुय्यमत्व संपविण्यासाठी स्त्रियांना त्यांचे अधिकार व मतदानाचा अधिकार बहाल केला.

एकंदरीत भारतात स्त्रियांच्या प्रगतीला १९ व्या शतकात सुरुवात झाली आणि विसाव्या शतकात या प्रगतीने मोठ्या प्रमाणात वेग घेतला. स्त्री शिक्षणास असणारा समाजाचा विरोध कमी झाला. स्त्रिया सार्वजनिक कार्यात हिरीरीने भाग घेऊ लागल्या .स्वातंत्र्य चळवळीत भाग घेऊ लागल्या. शिक्षण, समाजकारण, अर्थकारण, राजकारण, साहित्य ,कला या क्षेत्रात स्त्रीने स्वतःचे अस्तित्व सिद्ध करून दाखवले .जुन्या रुढी ,परंपरा, प्रथा यांना तिलांजली देण्यास सुरुवात केली व स्त्रियांना समाजकार्यात सहभागी होण्यास अनुमती दिली. राजकीय क्षितिजावर अनेक स्त्रिया पोहोचल्या विजयालक्ष्मी पंडित यांची रशियामध्ये भारताच्या वकील म्हणून नियुक्ती झाली. हे स्त्रियांच्या प्रगतीची काही उदाहरणे देता येतील.

१९५२ मध्ये देशात पहिल्या सार्वत्रिक निवडणुका झाल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्रियांच्या न्याय हक्कासाठी त्यांच्या संरक्षणासाठी हिंदू कोड बिल पास करून घेतले. त्यामध्ये स्त्रियांना विवाह, घटस्फोट, वारसाहक्क, दत्तक, इत्यादी विषयक महत्त्वाचे कायदेशीर हक्क मिळवून दिले. या हिंदू कोड बिल कायद्यामुळे स्वातंत्र्योत्तर काळातील स्त्रियांच्या विकासाला चालना मिळाली. स्त्रियांनी सर्व क्षेत्रात दैदिप्यमान अशी प्रगती केली. त्यामुळे त्यांच्या जीवनशैलीत बदल घडताना दिसू लागला. स्त्रियांच्या जीवनातून जुन्या रुढींचा कायापालट होऊ लागला. त्यातूनच प्रत्यक्ष स्त्रियांच्या जीवनात बदल जाणवू लागला.

१ मे १९६० ला स्वतंत्र महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. यासाठी महाराष्ट्रातील पुरुषांच्या बरोबरीने स्त्रियांनीही सहभाग घेतला .१९५३ मध्ये गोदावरी परुळेकर यांच्या नेतृत्वाखाली स्त्रिया सहभागी झाल्या .महाराष्ट्रातील विविध समस्या घेऊन अहिल्याबाई रांगणेकर मृणालताई गोरे, प्रमिला दंडवते यांनी तीव्र आंदोलन छेडली.

१९७५ मध्ये जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला. त्यामुळे स्त्रियांना प्रेरणा मिळाली आपल्या न्याय हक्कासाठी स्त्रियांनी चळवळी उभा केल्या. आंदोलने, संप, हरताळ यांनी वातावरण ढवळून निघाले. देशातील आणीबाणीच्या काळात आणीबाणीच्या विरोधात आंदोलने मोर्चे काढले गेले. यामध्ये मृणाल गोरे अहिल्या रांगणेकर यांना कारावास भोगावा लागला.

१९८० नंतरच्या काळात भारतीय समाज जीवनात मोठ्या प्रमाणावर बदल घडून आला. जागतिकीकरणामुळे संगणकीकरण, आयटीआयचे क्षेत्र इंटरनेटच्या माध्यमातून होणारे देशांतर्गत गुंतवणूक उद्योग व व्यापार यांना आलेले महत्त्व यातून शहराबरोबरच खेड्यांचा होणारा कायापालट या सर्वांचा परिणाम स्त्रियांच्या जीवनावर झाला खुली अर्थव्यवस्था मार्केटिंग त्यांना जरुरी पेक्षा जास्त महत्त्व आल्याने या क्षेत्रात स्त्रियांनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला ज्ञानपीठ पुरस्कार साहित्य क्षेत्रातील महत्त्वाचे पुरस्कार, भारतरत्न यासारखे राष्ट्रीय सन्मान स्त्रियांना सन्मानपूर्वक दिले गेले तुरुंग अधिकाऱ्यापासून ते राष्ट्रपती पदापर्यंत स्त्रियांची झालेली निवड हा भारतीय समाजातील स्त्रियांची जीवनमान उंचावणारा आहे.

**सारांश :**

अनेक वर्षापासून आपले छंद, शिक्षण ,नोकरी ,स्वातंत्र्य यापासून कोसो दूर असणारी स्त्री सामाजिक बदलामुळे खूपच बदलली गेली स्त्रीला तिच्या विकासाचा मार्ग खुला झाला.

महात्मा फुले,सावित्रीबाई फुले,डॉ.बाबासाहेब आंबेडकर, आगरकर, न्या.रानडे, महर्षी कर्वे या तत्कालीन समाज सुधारकांनी स्त्री अस्तित्व मिळवून दिल्यामुळे स्त्रीला अगतिक ते कडून अस्मितेकडे गुलामगिरीतून, स्वातंत्र्याकडे आणि काळोखातून नव्या संस्कृतीच्या प्रकाशाकडे जाता आले.

**संदर्भ :**

१. पाटील, पद्मजा-भारतीय इतिहासातील स्त्रिया-फडके प्रकाशन कोल्हापूर.
२. सबाने, अरुणा -स्त्रीवाद: एक दृष्टिकोन-आकांक्षा प्रकाशन, नागपूर
३. लांडे सुमती: स्त्रीवाद-शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर.
४. पाटील, शोभा: स्त्रीवादी विचार आणि समीक्षेचा मागवा-स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे.
५. धोंगडे अश्विनी: स्त्रीवादी समीक्षा: संकल्पना आणि उपयोजन-प्रकाशक डॉ. मु. व. शाह. का. स. वाणी प्रगत अध्ययन संस्था, धुळे.